## जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड

**दिनांक २६.०५.२००९ रोजी दुपारी ५.०० वाजता, जिल्हा उद्योग मित्र समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालय येथे मा. डॉ. श्रीकर परदेशी (भा.प्र.से.), जिल्हाधिकारी, नांदेड यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.**

सर्वप्रथम मा. अध्यक्ष, मा. आयुक्त, म.न.पा. मा. अधिक्षकीय उद्योग अधिकारी, नांदेड यांचे, तसेच सर्व सन्माननीय सभासदांचे स्वागत करुन बैठकीस, मा. अध्यक्षांच्या परवानगीने सुरुवात करण्यात आली. मागील बैठकीतील मुद्यावर कार्यवाही चालू असल्याची माहिती महाव्यवस्थापकांनी दिली. दिनांक १२.०९.२००८ रोजी संपन्न झालेल्या बैठकीतील इतिवृत्त कायम करण्यात आले. त्यानंतर खालीलप्रमाणे चर्चा करुन निर्णय घेण्यात आले.

| **अ. क्र.** | **मुद्या उपस्थित करणा-या संस्थेचे नांव** | **मुद्याचे स्वरुप** | **चर्चा / निर्णय** | संबंधीत कार्यालय | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| १ | -- | जिल्हा उद्योग मित्र बैठकी आधी, ऊर्जा मित्र व समन्वय समितीची बैठक घेणेबाबत | एम.आय.डी.सी.ने, जिल्हा उद्योग मित्र समिती बैठकीच्या अगोदर समन्वय समितीची बैठक घेतल्याचे सांगण्यात आले. त्याचबरोबर महावितरणने मात्र, ही बैठक घेतली नाही. उद्योजकांच्या अडी अडचणी सोडविण्यासाठी, या बैठका नियमितपणे जिल्हा उद्योग मित्र समितीच्या बैठकी अगोदर घ्याव्यात असे ठरले. | अधिक्षक अभ्यिंता, महावितरण, कार्यकारी अभियंता, एम.आय.डी.सी. | |
| २. | देगलूर खानापूर एमआयडीसी | देगलूर (खानापूर) एम.आय.डी.सी मध्ये स्वतंत्र इंडस्ट्रियल फिडर बसवून नियमीत विद्यूत पुरवठा | अधिक्षकीय अभियंता, महावितरण, नांदेड यांनी या बाबतीत पाठ पूरावा करावा असे सूचित करण्यात आले. | अधिक्षक अभियंता महावितरण, | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | असोसिएशन देगलूर | करणे बाबत. | | नांदेड | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३. | अध्यक्ष, कृष्णूर औद्योगिक संघटना, कृष्णूर | **१.**कृष्णूर एमआयडीसीमध्ये विद्युत उप केंद्र उभारुन नियमित विद्युत पुरवठा करणेबाबत.<br><br>**२.**कृष्णूर एमआयडीसीमध्ये बस थांबा देणेबाबत.<br><br>३.कृष्णूर एमआयडीसीमध्ये पथदिवे लावणेबाबत. | **१.** अधिक्षकीय अभियंता, महावितरण, नांदेड यांनी या बाबतीत पाठ पूरावा करावा असे सूचित करण्यात आले.<br><br>२. कृष्णूर एम.आय.डी.सी. येथे सर्व बसेसना थांबा घोषीत करण्यात आले आहते असे विभागीय नियंत्रक, म.रा. प.म.नांदेड यांनी सांगितले. थांबा असलेल्या ठिकाणी, शेड बांधणे बाबत चर्चा होऊन, शेड बांधण्या बाबतचा प्रस्ताव मुख्यालयास पाठवून त्याची मंजूरी घ्यावी तसेच नियोजित बस थांबा ठिकाणी २-३ दिवसात पाटी लावण्यात यावी असे मा. अध्यक्षांनी सूचित केले.<br><br>**३.** कृष्णूर एमआयडीसीमध्ये पथदिवे लावणेबाबतची कार्यवाही ८ ते १० दिवसात पुर्ण करण्यात येईल असे कार्यकारी अभियंता, एम.आय.डी.सी. यांनी सभागृहास सांगितले.<br><br>४. या बाबत मा. पोलीस अधिक्षक यांनी तयारी दर्शविली असून,आवश्यक असलेल्या १० एकर जागेसाठीचा प्रस्ताव विहीत नमुन्यात एम.आय.डी.सी.कडे सादर करावा. असे मा. अध्यक्षांनी सूचित केले. | अधिक्षक अभियंता महावितरण नांदेड<br><br>विभागीय नियंत्रक म.रा.प.म. नांदेड<br><br>कार्यकारीअभियंता MIDC नांदेड<br><br>पोलिस अधिक्षक | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | **४.** कृष्णूर एमआयडीसीमध्ये पोलिस स्टेशन कार्यान्वित होणेबाबत. | | कार्यालय, नांदेड | |
| ४. | श्री. बंगाली, अध्यक्ष लघु उद्योग संघटना, नांदेड | कृष्णूर एम.आय.डी.सी. मध्ये नियमित पाणी पुरवठा करणे बाबत. | सध्याच्या पाणी पुरवठा यंत्रणेमध्ये सुधारणा करणे आवश्यक असून काही प्रमाणात सुधारणा करण्याच्या दृष्टीने एम.आय. डी.सी. कृष्णूर येथे ५,००,००० लीटर पाणी साठविण्यासाठी रिझर्व्हवायर बांधले असल्याची माहीती सभागृहास देण्यात आली. त्याचबरोबर पुर्ण पाईप लाईन बदलण्यासाठी, टेंडर प्रक्रीया चालू असून, एक ते दीड वर्षात काम पुर्ण होईल अशी माहीती कार्यकारी अभियंता,मऔविम यांनी सभागृहास दिली. | कार्यकारी अभियंता, MIDC नांदेड | |
| ५. | श्री. बंगाली अध्यक्ष लघु उद्योग संघटना नांदेड | मुदखेड येथे फलोरिकल्चर पार्क उभारणीबाबत. | सध्या असलेल्या जागेत, पाण्याची उपलब्धता नसल्याने, एम.आय.डी.सी. नवीन जागेची पाहणी करत आहे, अशी माहीती सभागृहास कार्यकारी अभियंता, मऔविम यांनी दिली. नवीन जागेची निवड करतांना, भूजल सर्व्हेक्षण अधिकारी यांच्या सल्याने पाणी पूरवठा बाबत खात्री करुनच जमीन खरेदी करावी असे मा. अध्यक्षांनी सूचित केले. | EE, MIDC, नांदेड RO,MIDC लातूर | |
| ६. | श्री. बंगाली अध्यक्ष लघु उद्योग संघटना नांदेड | विशेष निर्यात क्षेत्र (औषधी) कृष्णूर येथे पायाभूत सुविधा लवकरात लवकर उभारणेबाबत. | कृष्णूर येथे विशेष निर्यात क्षेत्र (औषधी) सध्या प्राथमिक अवस्थेत असल्याची माहीती सभागृहास देण्यात आली. याबाबत पुर्ण माहीती घेवून सभागृहास देण्यात यावी असे मा. अध्यक्षांनी सूचित केले. | कार्यकारी अभियंता, MIDC नांदेड | |
| ७. | श्री. बंगाली | नांदेड येथे विमानतळावर फळे, | नांदेड विमानतळ लगत, हवाई माल वाहतूकीसाठी | कार्यकारी | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | अध्यक्ष लघु उद्योग संघटना नांदेड | फुले व भाजीपाला यांच्या वाहतूकीसाठी / साठवणूकीसाठी कोल्ड स्टोरेज उभारणेबाबत. | जागेची आवश्यकता असून त्याप्रमाणे १५ एकर जागेमध्ये याबाबतचा आराखडा तयार केला असून, सध्या ती जमीन प्राप्त झालेली नाही असे कार्यकारी अभ्यिंता, एम.आय.डी.सी. यांनी सभागृहास सांगितले. | अभियंता, MIDC नांदेड | |
| ८. | श्री. गुरुनाथराव माणिकराव कुरुडे, माजी आमदार, कंधार | एमआयडीसी, कंधार येथील आय.टी.आयमध्ये, पाणीपुरवठा करणेबाबत. सध्या टँकरने पाणीपुरवठा होत आहे. | कंधार एम.आय.डी.सी.मध्ये पाणी पुरवठा पाईप लाईन अतिशय जुनी असल्याने, नवीन पाणी पुरवठा पाईपलाईन करण्याचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविला असून त्यास मंजूरी अद्याप मिळाली नाही अशी माहीती कार्यकारी अभियंता यांनी दिली. त्या प्रस्तावाचा पाठपूरावा करावा असे मा.अध्यक्षांनी सूचित केले. | कार्यकारी अभियंता, MIDC नांदेड | |
| ९. | श्री. कमलकिशोर लक्ष्मीनिवास राठी, चेअरमन, दि धर्माबाद सह. औद्यो. वसा. मर्या., धर्माबाद. | धर्माबाद औ.व. येथे २४ तास लाईट देण्यासाठी महावितरणने मंजूरी दिली असून त्यासाठी न.प. धर्माबाद यांच्याकडून जागा उपलब्ध करुन देण्यात यावी. | नगर परिषद् धर्माबाद यांच्याकडे सब स्टेशन करिता जमीन उपलब्ध नसल्याची माहीती प्रतिनिधी, नगर परिषद धर्माबाद यांनी दिली. यावर मा. अध्यक्षांनी, महावितरण कार्यालयाने, सब स्टेशनसाठी दुसरी जमीन अधिग्रहीत करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी असे सूचित केले. | अधिक्षकी अभियंता, महावितरण, नांदेड | |
| | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १०. | श्री. कमलकिशोर लक्ष्मीनिवास राठी, चेअरमन, दि धर्माबाद सह. औद्यो. वसाहत मर्या., धर्माबाद. | १९६२ पासून स्थापित असलेल्या धर्माबाद वसाहतीकडून, न.प.धर्माबाद यांनी टॅक्स घेवूनसुध्दा आजपर्यंत कोणतीच मुलभूत सुविधा उदा.: रोड, नाली, रस्ते, स्ट्रीट लाईट पुरविले नाहीत. करिता न.प. धर्माबाद यांना निर्देश देवून सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. | धर्माबाद येथील सहकारी औद्योगिक वसाहतीमध्ये, नगर परिषदेने मुख्य रस्ता तयार केला असून, स्ट्रीट लाईट काही प्रमाणात सुरु केले असल्याची माहीती प्रतिनिधी नगर परिषद, धर्माबाद यांनी दिली. याबाबत, सद्य:स्थितीची माहीती घेवून सभागृहास सादर करावी असे मा.अध्यक्षांनी सूचित केले. | मुख्याधिकारी, न. प. धर्माबाद/ महाव्यवस्थापक, जिउकें नांदेड | |
| ११. | श्री. ए. बी. बंगाली, अध्यक्ष, लघु उद्योग संघटना, नांदेड | कृष्णूर येथे राष्ट्रीयीकृत बँकेची शाखा उघडावी. | कृष्णूर एम.आय.डी.सी. जवळ, नायगांव येथे SBI ची शाखा कार्यरत असून, त्याबँकेमार्फत सध्या पतपुरवठा करण्यास कसलीही अडचण नसल्याचे जिल्हा अग्रणी बँक अधिकारी यांनी सभागृहास सांगितले. | **जिल्हा अग्रणी बँक, नांदेड.** | |
| १२. | श्री. रामदास रोकडोजी माडेवार, अध्यक्ष, नांदेड जिल्हा यंत्रमाग हातमाग | **१.** टेक्सटाईल पार्कसाठी ५० एकर जागेची मागणी गेल्या पाच वर्षापासून सतत करुनसुध्दा अद्याप जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही, तरी मागणीप्रमाणे जमीन देण्यात यावी. | कृष्णूर एम.आय.डी.सी. येथे टेक्सटाईल पार्कसाठी प्रस्ताव, सहा महिन्यापूर्वी पाठूवन सुध्दा अद्यापही कार्यवाही झाली नसल्याबदल खेद व्यक्त करुन, याबाबत अ.शा.पत्र एम.आय.डी.सी.चे सहमुख्य कार्यकारी अधिकारी यांना पाठविण्यात यावे असे मा. अध्यक्षांनी सूचित केले. | **RO, MIDC लातूर** | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | असो., नांदेड. | | | | |
| १३. | कृष्णूर औद्योगिक संघटना, कृष्णूर | कृष्णूर एमआयडीसीमध्ये फायर स्टेशन उभारणेबाबत. | कृष्णूर एम.आय.डी.सी.येथे फायर स्टेशन उभारण्याबाबत प्रस्ताव तयार करीत असल्याचे कार्यकारी अभियंता,मऔविम यांनी सभागृहास सांगितले. नांदेड एम.आय.डी.सी. येथे फायर स्टेशन सुरु केल्याची माहीती सभागृहास कार्यकारी अभियंता, मऔविम यांनी दिली. | कार्यकारीअभियंत ा, एमआयडीसी, नांदेड | |
| १४ | श्री. ए. बी. बंगाली, अध्यक्ष, लघु उद्योग संघटना, नांदेड | एम.आय.डी.सी.नांदेड येथील रस्ते दुरुस्त करणे बाबत. | कार्यवाही पुर्ण झाल्यामुळे हा मुद्या निकाली काढण्यात आला. | | |
| १५ | नांदेड सहकारी औद्योगिक वसाहत, नांदेड | सहकारी औद्योगिक वसाहतीतील सुधारीत भुईभाडे वसुली संबंधी फेर विचार करणेबाबत. | उद्योग संचालनालयाने सुधारीत भुईभाडे वसुलीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविल्याचीमाहीती महाव्यवस्थापक, जिउकें यांनी सभागृहास दिली. | **महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड** | |
| १६ | जय हनुमान टेक्सटाईल सोसायटी,नांदेड | पॉवरलूम धारकासाठी २४ तास वीज पूरवठा मिळणे बाबत | यंत्रमाग धारकासाठी अखंडीत वीज पुरवठा एम.आय.डी.सी.हदीतील फिडर मधून देण्यात यावा असे निर्देश तत्कालीन उद्योग मंत्री, म.रा. यांनी दिलेहोते. त्याअनुषंगाने महावितरण कार्यालयाने जिल्हा नियोजन समिती अथ्ंवा मुख्यालयाकडे प्रस्ताव पाठवून त्यासाठी योग्य ती तरतूद मागवून घ्यावी | **अधिक्षक अभियंता, महावितरण, नांदेड** | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | असे मा. अध्यक्षांनी सूचित केले. | | |
| १७ | -- | एम.आय.डी.सी. व सहकारी औद्योगिक वसाहती मध्ये वनीकरण करणे बाबत. | मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा उद्योग मित्र यांनी एम.आय.डी.सी. क्षेत्रातील व सहकारी औद्योगिक वसाहतीतील उद्योजकांना असे आवाहान केले की, त्यांनी त्यांच्या भूखंडामध्ये व कपाउंड वालच्या बाहेर वनीकरण करावे. या आव्हानास सर्व संबंधीत उद्योजकांनी संमती दर्शविली. | **सर्व औद्यो. संघटना** | |

**<u>नवीन मुद्दे</u>**

| **अ. क्र.** | **मुद्या उपस्थित करणा-या संस्थेचे नांव** | **मुद्याचे स्वरुप** | **चर्चा / निर्णय** | संबंधीत कार्यालय | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| १ | नांदेड जिल्हा लघुउद्योग संघटना, नांदेड | नांदेड औद्योगिक क्षेत्रामध्ये विद्युत पुरवठयासाठी,एम.आय.डी.सी. परिसरात पोल उपलब्ध करुन दयावेत. | विद्युत पुरवठयासाठी एम.आय.डी.सी. क्षेत्रातील अतिशय छोटया उद्योगासाठी ही बाब खर्चीक असल्यामुळे याबाबत उपाय शोधण्यासाठी कार्यकारी अभियंता,मऔविम व अधिक्षक अभियंता, महावितरण यांनी चर्चा करावी असे मा. अध्यक्षांनी सूचित केले.<br>तसेच नांदेड एम.आय.डी.सी.मध्ये महावितरण नवीन सब स्टेशन सुरु करणार असून, त्यासाठी जागा मागणीचा अर्ज एम.आय.डी.सी.कडे केला असल्याची माहीती श्री. कामतीकर, प्रतिनिधी महावितरण यांनी | एम.आय.डी.सी. नांदेड | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | दिली. सध्या कार्यरत असलेल्या सबस्‍इेशनचे बांधकाम कमी झाल्यामुळे ती मोकळी जागा, यासाठी देता येईल अशा प्रकारचा अहवाल प्रादेशिक अधिका-यांना पाठविल्याची माहीती भूमापक श्री. चौधरी यांनी सभागृहास दिली. प्रस्ताव मंजूरीसाठी, व्यवस्थापकीय संचालक, महावितरण यांना मा. जिल्हाधिकारी यांच्या स्वाक्षरीने पत्र पाठवावे असे मा. अध्यक्षांनी सूचित केले. | | |
| २ | नांदेड जिल्हा लघुउद्योग संघटना, नांदेड | विद्युत पुरवठा मिळण्यासाठी एम.आय.डी.सी.कार्यालयाच्या ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नसावी. | एम.आय.डी.सी. ही औद्योगिक क्षेत्रासाठी मुख्य संस्था असल्याने, हा प्रस्ताव मान्य करता येत नाही असे मत सभागृहाने व्यक्त केले. | एम.आय.डी.सी. | |
| ३ | नांदेड जिल्हा लघुउद्योग संघटना, नांदेड | पाण्याचे मीटर खराब असल्यास त्यांचे दंड आकारल्यास, त्यांचे मागील एका महिन्याचे बील अव्हरेज काढून बील द्यावे. | या बाबत सविस्तर चर्चा होवून कार्यकारी अभियंता,एम.आय.डी.सी. यांनी नियमाप्रमाणे कार्यवाही करावी असे मा. अध्यक्षांनी सूचित केले. तसेच उद्योजकांनी काही प्रकरणांत बील जास्त आले असल्यास कार्यकारी अभियंता यांच्याशी चर्चा करावी असे मा. अध्यक्षांनी सूचित केले. | | |
| ४ | नांदेड जिल्हा लघुउद्योग संघटना, नांदेड | अग्नीशमन दलाची सुविधा नसल्यामुळे शुल्क आकारु नये. | अग्नीशमन दलाची सुविधा व शुल्क यांचा कसलाही संबंधी नाही अशीं माहीती कार्यकारी अभियंता यांनी दिली. मात्र उद्योजकांच्या सोयीसाठी, नांदेड येथे अग्नीशमन दल अल्प कालावधीत कार्यान्वीत करण्यात येईल अशी माहीती त्यांनी दिली. कृष्णूर येथें सुध्दा अशा प्रकारची सुविधा लवकरात लवकर उपल्बध करुन | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | द्यावी असे मा.अध्यक्षांनी सूचित केले. | | |
| ५ | नांदेड जिल्हा लघुउद्योग संघटना,नांदेड | एम.आय.डी.सी.नांदेड लगतच्या मोठया उद्योगांना पाणी पुरवठा देण्याबदल केलेल्या कार्यवाहीबाबत माहीती देणे. | एम.आय.डी.सी. लगतच्या मोठया उद्योगांना पाणी पुरवठा देण्याबाबत कार्यकारी अभियंता, मऔविम यांनी तयारी दर्शविली. तसे अर्ज उद्योजकांनी करावेत अशी सुचना करण्यात आली. | | |
| ६ | कृष्णूर औद्योगिक संघटना, | कृष्णूर एम.आय.डी.सी.मध्ये नवीन रस्ते करणे बाबत कार्यवाही करावी | कृष्णूर एम.आय.डी.सी. परिसरात सध्या कच्चा रोड असून, पक्के डांबरी रोड लवकरात लवकर करण्यात येतील अशी माहीती कार्यकारी अभियंता,मऔविम यांनी दिली. | | |
| | | | | | |
| ७ | नांदेड जिल्हा लघुउद्योग संघटना, नांदेड | उद्योगाची तपासणी करतांना लघुउद्योग संघटनांचा प्रतिनिधी सोबत घ्यावा. | नियमासप्रमाणे अशाप्रकारे मपासणीच्या वेळी औद्योगिक संघटनेचा प्रतिनिधी सोबतघेणे शक्य नसल्याचे उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी स्प्ष्ट केले. त्यामुळे हामुद्या निकाली काढण्यात आला. मात्र अशाप्रकारची उद्योजकांची विनंती मुख्यालयास पाठवू असे त्यांनी मान्य केले. | | |
| ८ | नांदेड जिल्हा लघुउद्योग संघटना,नांदेड | महाराष्ट्र शासनाच्या प्रोत्साहन योनजेअंतर्गत मिळण्ारी रक्कम एकदाच दयायाची सुविधा करावी. | ही धो्रणात्मक बाब असून, याविषयी मागील दोन वर्षात अनेक औद्यो.संघटनांनी सुचना केली आहे. अशी माहीती मा.अधिक्षकीय उद्योग अधिकारी यांनी दिली. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांनी सन २००६ च्या प्रोत्साहन योजनेची माहीती सभागृहाला दिली. | | |
| ९ | नांदेड | भूखंड वाटप करतांना व हस्तांतरण | भूख्ंड वाटप करतांना व हस्तांतरण करतांना अधिका- | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | जिल्हा लघुउद्योग संघटना, नांदेड | करतांना संघटनांना माहीती दयावी | यांनी पारदर्शकता पाळणे गरजेचे असून, आलेले अर्ज व्यवस्थित नोंदवून, भूखंड देण्यासाठी त्याचे निकष तयार करण्यावर मा. अध्यक्षांनी विस्तृत विवेचन केले. तसेच हया पध्दतीची लवकरात लवकर अंमलबजावणी करण्यात यावी व यासाठी सर्व औद्योगिक संघटनांना माहीती देण्यात यावी असेही मा. अध्यक्षांनीसूचित केले. हयाबरोबर, सर्व औद्यो. संधटनांनी त्योंच्या लेटर हेडवर सर्व पदाधिका-यांची नांवे व रजि.नं. प्रिंट करावेत असे सूचित केले. | | |
| १० | नांदेड जिल्हा लघुउद्योग संघटना, नांदेड | नांदेड जिल्हयात सिडबी या बॅंकेचे शाखा सुरु करावी. | या संबंधी प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, नांदेड यांनी डिसेंबर-२००८ मध्ये पाठविला असून, सिडबीने या बाबत सकारात्मक प्रतिसाद दिला असल्याची माहीती महाव्यवस्थापकंानी दिली. | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, | |
| ११ | नांदेड जिल्हा लघुउद्योग संघटना, नांदेड | ज्या उद्योगाची वार्षिक उलाढाल २.०० कोटी पेक्षा कमी आहे. त्या उद्योगांना पी.एफ.लागू करु नये. | हा धोरणात्मक मुद्या असल्याने याबाबत कसलीही चर्चा करण्यात आली नाही. | | |
| १२ | नांदेड जिल्हा लघुउद्योग संघटना, नांदेड | नांदेड येथे ई.एस.आय. हॉस्पीटल व इतर सुविधा उपलब्ध होतनाही, तो पर्यंत ई.एस.आय.लागू करु नये. | नांदेड येथे ई.एस.आय. कार्यान्वीत नसल्याचे, औद्यो. संघटनांनी मा.अध्यक्षांच्या निदर्शनास आणून दिले. सध्या ई.एस.आय. हॉस्पीटलसाठी, स्वायत्त डॉक्टरांना प्राधिकृत केल्याची माहीती मा.अधिकीय उद्योग अधिकारी यांनी दिली. | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | नांदेड वाघाळा महानगरपालिकेचे हॉस्पीटल ई.एस.आय. हॉस्पीटल मध्ये रुपांतरीत करण्याची शक्यतातपासून पाहण्यासाठी संबंधित यंत्रणेला मा. जिल्हाधिकारी यांच्या स्वाक्षरीने पत्र पाठविण्यात यावे असे मा. अध्यक्षांनीसूचित केले. | | |
| १३ | नांदेड को-ऑप.इंड. इस्टेट,नांदेड | अतंर्गतरस्ते, ड्रनेज, स्ट्रीट लाईट पाणी पुरवठा, आठवडी बाजार इ. बाबतीत महानगरपालिकेत कार्यवाही करणे बाबत. | महानगरपालिकेने अंतर्गत रस्ते पुर्ण केलेले असून, पाणी पुरवठया बाबत लवकरात लवकर कार्यवाही वुर्णकरण्यातयेईल अशी माहीती मा.आयुक्तांनी दिली. तसेच काही ठिकाणी नादुरुस्त स्ट्रीट लाईट दुरुस्त करुन देण्यात येतील. तसेच यावसाहतीतील आठवडी आजार, एका महिन्यात दुस-या ठिकाणी स्थलांतरीत करण्यात येईल असे आश्वासन मा. आयुक्तांनी सभागृहास दिले. तसेच सह.औद्यो.वसाहतीतील रस्त्यावर जीवाहने बेकायदेशरपरणे पार्क होतात, त्यांच्यासाठी महानगरपालिका पे ॲन्उ पार्कही सुविधाद्यायला तयार असून, त्यासाठी वसाहतीने नाहरकत प्रमाणपत्रद्यावे अशी त्यांनी विनंती केली. श्री. हशर्द शहा यांनी रोडच्या रुंदीनुसार कर आकारण्यात यावेत अशी विनंती त्यांना केली. सर्व बाबी तपासून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे मा.आयुक्त, म.न.पा.यांनी सांगितले. | मा. आयुक्त, मनपा | |
| १५ | नांदेड को-ऑप.इंड. इस्टेट,नांदेड | विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी, ३३ के.व्ही. उपकेंद्र त्वरीत कार्यान्वीत करणेबाबत, | सह.औद्यो.वसाहतीतील, ३३ के.व्ही. उपकेंद्र, येत्या१५ दिवसात । कार्यान्वीत करण्यातयेईल. अशी माहिती श्री. कामतीकरप्रतिनिधी महावितरण यांनीदिली. | अधिक्षक अभियंता, महावितरण | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| १६ | नांदेड को-ऑप.इंड. इस्टेट,नांदेड | अकृषिक कराची वसुली न करणे बाबत. | अकृषिक कर वसुली बाबत व्यवस्थापक, सह.औद्यो.वसाहत यांनी तहसिलदार नांदेड यांच्याबरोबर जिल्हाधिकारी कार्यालयात दिनांक २७.०५.२००९ रोजी चर्चा करावी असे मा. अध्यक्षांनी सूचित केले. | व्यवस्थापक, सह.औद्यो.वसाहत | |
| | | | श्री. हर्षद शहा यांनी विक्रीकर /व्हॅट मध्ये कॅरी फरवर्ढ ची सवलत मिळण्यासाठी, जिल्हा उद्योग मि)ा समितीने अशी विनंती केली. तसेच कापूस खरेदी महासंघांने,` सरकी विकतांना दाखविलेले नमूने व प्रत्यक्षातील माल यामध्ये बरीच तफावत येत असल्याची माहीती सभागृहास दिली. यासाठी व्यवस्थाकीय संचालक, कापूस खरेदी महासंघ यांच्या नजरेस ही बाब आणल्याची माहीती श्री.शहा यांनी दिली. मा. अध्यक्षांनी श्री. हर्शद शहा यांच्याशी सविस्तर चर्चा करुन, त्यांनी केलेल्या पत्रव्यवहाराची प्रत जोडून मा. अध्यक्ष यांच्याकडे सादर करावेत असे सूचित केले. जेणेकरुन मा. जिल्हाधिकारी हे स्वत:च्या स्वाक्षरीने` विक्रीकर खात्याला व महासंघाला पत्र पाठवू शकतील. | श्री. हर्षद शहा अध्यक्ष | |
| | | | ईलेक्ट्रीसीटी ठयुटीची मुदत १.४.२००९ रोजी संपली असल्याचे श्री. हर्षद शहा यांनी सभागृहाच्या निदर्श्नास | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | आणू्न दिले.  याबाबत महाव्यवस्थापक यांनी शासनाच्या २००६ च्या  प्रोत्साहन योजनेची माहीती देवून नवीन उद्योगांना ही सवलत अजूनही  लागू असल्याची माहीती दिली.   श्री हर्षद शहा यांनी  निदर्शनास आणून दिलेल्या बाबीवर,   जिल्हा उद्योग केंद्राने  कार्यवाही करावी असे  मा.अध्यक्षांनी सूचित केले. नांदेड जिल्हयात दाल व ऑईल उद्योग अद्यापही  पारंपारीक अवस्थेत असून,  त्यांच्यासाठी,  भारत सरकारच्या टैक्सटाईल अपग्रेडेशन योजनेप्रमाणे दाल व आईल मिल | केंद्र, नांदेड | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | अपग्रेडेशन योजना सुरु करावी असाप्रस्ताव श्री. शहायांनी मांडला. यास मा.अध्यक्षांनी सहमती दर्शवून श्री. हर्षद शहा यांनी सविस्तर प्रस्ताव सादर करावे असे निर्देश दिले. | | |

## दिनांक २६.०५.२००९ रोजी झालेल्या जिल्हा सल्लागार समिती सभेचे इतिवृत्त

**दिनांक २६.०५.२००९ रोजी सायं. ५.०० वा. मा. डॉ. श्रीकर परदेशी (भा.प्र.से.), जिल्हाधिकारी, नांदेड तथा अध्यक्ष जिल्हा सल्लागार समिती यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली.**

**सर्वप्रथम महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड तथा सदस्य सचिव, जिल्हा सल्लागार समिती, नांदेड यांनी, अध्यक्षांचे व सर्व सन्माननीय उपस्थितांचे स्वागत केले. मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेस सुरुवात केली.**

**महाव्यवस्थापक यांनी सन २००८-२००९ या वर्षात जिल्हा उद्योग केंद्रा मार्फत राबविल्या जाणा-या सर्व योजनांचा आढावा सभागृहास सादर केला. शासनाने दिलेले सर्व उद्यिष्ट पुर्ण केल्याबदल मा. अध्यक्षांनी समाधान व्यक्त केले. याबाबत मा. जिल्हाधिकारी यांनी अभिनंदन पत्र दिले असून, त्याबदल मा. जिल्हाधिकारी यांचे आभार मानण्यात आले. तसेच सन २००९-२०१० यावर्षी प्राप्त झालेल्या उद्यिष्टांची देखील माहीती देण्यात आली. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांनी, कार्यालयाने प्रस्तावित केलेल्या, उद्योग भवन, प्रादेशिक कार्यालय, एम.सी.ई.डी., किनवट येथे आदिवासीसाठी प्रशिक्षण केंद्र सुरु करणे इ. निर्णयांची माहीती सभागृहास दिली. मा. अध्यक्षांनी, यवतमाळ येथील उद्योग भवनच्या धर्तीवर, येथील उद्योग भवन बांधावे अशी सुचना केली. औद्योगिक संघटनांनी उद्योग भवनमध्ये जागा मागितली, त्या अनुषंगाने त्यांनी एम.आय.डी.सी.कडेप्रस्ताव सादर करावा असे ठरले.**

**शेवटी मा. जिल्हाधिकारी, नांदेड तसेच सर्व उपस्थित अधिकारी व पदाधिकारी यांचे महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड यांनी आभार मानले व मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.**

स्वाक्षरीत/-
**मा. जिल्हाधिकारी, नांदेड**
**तथा अध्यक्ष**
**जिल्हा सल्लागार समिती सभा**

स्वाक्षरीत/-
**महाव्यवस्थापक**
**जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड**
**तथा सदस्य सचिव**
**जिल्हा सल्लागार समिती सभा**